# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ-2013/प्र.क्र.11/का.12
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई 400 032
दिनांक - २६/११/२०१३

**प्रति,**

जिल्हाधिकारी सर्व,
आयुक्त, महानगरपालिका सर्व,
मुख्याधिकारी सर्व.

**विषय:-स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतदान यंत्रावरील "वरील पैकी एकही नाही" (NOTA) बटणाच्या वापराबाबत पूरक आदेश...**

उपरोक्त विषयान्वये राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदारांसाठी मतपत्रिकेवर 'वरील पैकी एकही नाही' (NOTA) ही सोय उपलब्ध करून देण्याबाबत आदेश यापुर्वीच केले आहे. तथापि, एखादया उमेदवारास मतदान करण्याची इच्छा नसल्यास व त्याने 'वरील पैकी एकही नाही' (NOTA) हे बटन देखील दाबण्यास नकार दिला तर कोणती कार्यपध्दती अवलंबावी याबाबतचे आदेश सोबत जोडले आहेत.

तसेच मतदान यंत्रावर 'वरील पैकी एकही नाही' (NOTA) हा पर्याय उपलब्ध करून दिल्याने त्या अनुषंगाने या प्रक्रियेविषयी मतदारांना माहिती करून देण्याकरिता एक माहिती पट राज्य निवडणूक आयोगाने तयार केला आहे. हा माहिती पट राज्य निवडणूक आयोगाची **<u>www.mahasec.com</u>** या संकेतस्थळावर 'मतदार जागृती अभियान' या लिंकवर अपलोड केला आहे. तरी त्याचे अवलोकन व्हावे.

( अविनाश सणस )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतदान यंत्रावरील " वरीलपैकी एकही नाही " (NOTA) बटणाच्या वापराबाबत पूरक आदेश...

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक- रानिआ-2013/प्र.क्र.11/का.12
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई 400 032
दिनांक - 26.11.2013

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.12 नोव्हेंबर, 2013 चे आदेश.

**आदेश**

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराला मतपत्रिकेवरील कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याची इच्छा नसली तरी त्याला आपला मतदानाचा हक्क गोपनीयरित्या बजावता यावा याकरिता मतदान यंत्रावर 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) हा पर्याय संदर्भाधिन आदेशान्वये उपलब्ध करुन दिला आहे.

आणि ज्याअर्थी, मतदार त्यांना मतपत्रिकेवरील उमेदवारांना मतदान करण्याची इच्छा नसल्यास ते 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबून आपला मतदानाचा हक्क गोपनीयरित्या बजावू शकतात. मात्र काही मतदार, मतदान कक्षात आल्यानंतर आपले मतदान पूर्ण करणार नाहीत अथवा कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याची इच्छा नसली तरी 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबण्यासदेखील नकार देतील त्याठिकाणी कोणती कार्यपध्दती अवलंबावी याबाबत कार्यपध्दती ठरवून देणे आवश्यक आहे.

आणि त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 243 के व 243 झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 (1888 मुंबई 3) च्यां कलम 18ए(4), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 (1949 मुंबई 59)च्या कलम 14(4), महराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 च्या कलम 10ए (4), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, 1961 (सन 1961 चा महा.5) च्या

कलम 9ए (4), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, 1958 (सन 1959 चा मुंबई 3) च्या कलम 10ए (4) अनुसार पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

१. मतदार आपले मतदान पूर्ण न करता मतदान कक्षामधून बाहेर निघाला तर मतदान अधिकारी / मतदान केंद्राध्यक्ष यांना कंट्रोल युनिटवरील लाल दिवा न विझल्यामुळे तसेच बिप साऊंड न आल्यामुळे मतदाराने, मतदान पूर्ण केलेले नाही ही गोष्ट लक्षात येईल.

२. अशा परिस्थितीत मतदान केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदाराला त्याचे मतदान पूर्ण न झाल्याबाबतची कल्पना देऊन पसंतीच्या उमेदवाराला मत देऊन अथवा 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबून मतदान पूर्ण करण्याबाबत विनंती करावी.

३. जर मतदाराने पुन्हा मतदान कक्षात जाऊन त्यानुसार मतदान केल्यास, त्याठिकाणी त्या मतदाराची मतदान प्रक्रिया पूर्ण होईल.

४. मात्र जर एखाद्या मतदाराने पसंतीच्या उमेदवाराला मत देण्यास अथवा 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबण्यास नकार दिला तर मतदान केंद्राध्यक्षांनी बॅलट युनिटवरील उमेदवारांचे नावासमोरील दिवे एखादा पुठ्ठा अथवा पुस्तक ठेवून झाकावेत. त्यानंतर मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींना बरोबर घेऊन त्यांच्या साक्षीने ज्या मतपत्रिकेवरील मतदान अपूर्ण झाले आहे त्या मतपत्रिकेवरील 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन / बटने दाबून मतदान प्रक्रिया पूर्ण करावी.

५. जर एखाद्या मतदाराने मतदान कक्षात जाण्यापूर्वीच मतदानास नकार दिला तर अशा मतदाराच्या मतदार नोंदवहीतील (व्हीएम-1) नोंदीसमोर अभिप्राय या रकान्यात मतदानास नकार दिल्याची नोंद घ्यावी. याठिकाणी नोंदविलेल्या मतांच्या हिशोबामध्ये (व्हीएम-3) अनुक्रमांक 3 येथे अशा मतदारांची संख्या नमूद करण्यात येईल.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( अविनाश सणस )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र